## निशाण क्र. ११४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी कागदपत्र दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, दाव्याचे कामी महत्वाचा कागद हजर करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सदरचा कागद यापूर्वी दाखल करणे नजरचुकीने राहून गेलेले आहे. तरी सदर कागद हजर करण्याची परवानगी व सवड असावी. सदरचा कागद सार्वजनिक दस्तऐवज असल्याने सदर कागदपत्राला निशाण देण्यात यावे व सदर दाव्याचे कामी पुराव्याचा कागद म्हणून निर्णयाच्या वेळी वाचण्यात यावा अशी प्रतिवादी क्र. १ यांनी विनंती केली आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यनुसार अर्जात नमूद कारण योग्य नाहीत. सबब अर्ज फेटाळण्यात यावा.

३. प्रतिवादी क्र. १ व वादी यांचे तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर कागदपत्र हे वाद विषयाशी संबंधित आहेत असे दिसून येते. सदरचा दावा हा कायम मनाईकरीता आहे. प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ यांना हे कागदपत्र दाखल करण्यास परवानगी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्या सारखे होईल असे वाटते. परिणामी त्यांचे कशानेही भरून न येणारे अपरिमित नुकसान होईल असे वाटते. याउलट अशी परवानगी मंजूर केल्यास वादीचे कसलेही नुकसान होईल असे वाटत नाही. सदर कागदपत्र दाखल करण्यास परवानगी दिल्यास वाद विषयाचे गुणावगुणावर निवारण होण्यास मदतच होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस

क्रमप्राप्त आहे असे वाटते. परिणामी खालील आदेश पारीत करीत आहे:

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड ( बी.आर.पाटील )
दिनांक: २४/०३/२०२१ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2021.03.25 13:24:02 +0530